अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील SAS सॉफ्टवेअर अनुज्ञप्ती नुतनीकरण करण्यास व नवीन २० संगणक खरेदी करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : असांसं १३१९/८८२/प्र.क्र. ६१/का-१४१७
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २० जुलै, २०१९

वाचा : नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ८०/का-१४२६ दिनांक १ नोव्हेंबर, २०१८

प्रस्तावना:

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संगणकीकरणाच्या सुविधांच्या अद्ययावतीकरण करण्यासाठी सन २००७ मध्ये ५ वर्षाच्या कालावधीसाठी Turn-key Solution Provider (TSP) BSIL या संस्थेची नियुक्ती करण्यात आली व त्यावेळी SAS सॉफ्टवेअर स्थापित करण्यात आले. तेव्हापासून सांख्यिकी कामे, माहिती संस्करण प्रक्रिया तसेच वार्षिक योजना इत्यादी महत्वाच्या संगणकीकृत कामांमध्ये SAS चा मोठया प्रमाणावर वापर करण्यात येत आहे. TSP संस्थेचा करार दिनांक ३०.०६.२०१४ रोजी संपुष्टात आल्यानंतर अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत SAS Software अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करण्यात येत आहे. SAS चे अनुज्ञप्ती हे परपेच्युअल आहे. तथापि SAS Software Package चे Updates, Upgrades, Patches व Support यासाठी SAS अनुज्ञप्ती चे नुतनीकरण करण्याची बाब त्याचबरोबर SAS ९.३ हे Version Upgrade करुन Cloud वर SAS ९.४ हे Version स्थापित करण्यात आले असून ते Access करण्यासाठी कार्यालयातील संगणकावरती Window १० ही ऑपरेटींग प्रणाली आवश्यक आहे. त्याकरीता अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकरीता दिनांक ३०-०६-२०१९ पासून एक वर्षासाठी SAS License नूतनीकरणासाठी तसेच १६ GB RAM व Window १० ऑपरेटींग प्रणाली असलेले नवीन २० संगणक खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांना मे. सास इन्स्टिट्युट (इंडिया) प्रा. लि. या कंपनीकडून SAS Software अनुज्ञप्तीचे दिनांक ३०-६-२०१९ ते दिनांक २९-६-२०२० या एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करण्यास तसेच २० नवीन संगणक Gem Portal वरून खरेदी करण्यास व त्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे येणा-या रुपये ४२,१२,२१४/- (रुपये बेचाळीस लाख बारा हजार दोनशे चौदा फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	तपशील	दर करारानुसार प्रती नग किंमत	एकूण संख्या	सर्व करासहीत एकूण किंमत रूपये
१	**Desktop Computer-** Intel Q Series, Windows 10, Operating System	रु. ९१,०००/-	२०	१८,२०,०००
२	SAS Software अनुज्ञप्ती नुतनीकरण	रु. २०,२७,३००/- + वस्तु व सेवाकर रु. ३,६४,९१४/-	--	२३,९२,२१४
	एकूण		**२०**	**४२,१२,२१४/-**

२. उपरोक्त खरेदीबाबत संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी पुरवठादारास अदा करावयाच्या रकमेबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक १ डिसेंबर, २०१६, वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र. ९२/अर्थ-३ दिनांक ८ जुलै, २०१९ मधील खरेदी संदर्भातील अटीचे व संगणक खरेदी संदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सूचनांचे तसेच शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. SAS Software अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी मे. सास इन्स्टिट्युट (इंडिया) प्रा. लि. या संस्थेस आगाऊ रक्कम (Advance Payment) अदा करण्यात यावे.

३. सदरचा खर्च मागणी क्र. ओ-९, ३४५४ गणना, सर्वेक्षण व सांख्यिकी, ०२ सर्वेक्षण व सांख़्यिकी, ११२ आर्थिक सल्ला व सांख्यिकी (०३) (०५) इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण केंद्र, (योजनांतर्गत योजना) ३४५४०३८५ (योजनेत्तर), १७ संगणकावरील खर्च, या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या निधीमधून करण्यात यावा.

४. या लेखाशीर्षाखाली होणा-या खर्चासाठी संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे नियंत्रक अधिकारी असतील व लेखा अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्याची तसेच खर्चाची माहिती वेळोवेळी शासनाला देण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांची राहील.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ८०/का-१४२६ दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ अन्वये नियोजन विभागांतर्गत संगणकीकरण प्रकल्प अंमलबजावणीसाठी पुनर्रचना

करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेनुसार तसेच समितीस प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२०१६५००६८९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT DATTA BHANGLE

Digitally signed by HEMANT DATTA BHANGLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=31cc357a98de35264e3f32a02a11a5f444ac03f702947b9db1e018f1ec6ec357, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3e3482a3b78b132fd024af2073b3b3aa28fe67898c829b2dc628c953bb336e14, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=HEMANT DATTA BHANGLE
Date: 2019.07.20 16:57:50 +05'30'

(हेमंत भांगले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.

२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.

३) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

५) प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई-३२

६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनाय, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

८) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

९) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर

१०) राज्य सूचना विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई

११) अपर संचालक (इआसंकें), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रशासकीय इमारत, मंत्रालय

१२) नियोजन विभाग (का-१४११ / १४२४), मंत्रालय, मुंबई-३२

१३) निवड नस्ती, का-१४१७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.